रु. 7.00 ISBN 81-237-3175-2
नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

# पंचतंत्रातील दोन कहाण्या

रूपांतर : विनीता अग्रवाल
अनुवाद : ललिता रिसबूड



*नवसाक्षर साहित्यमाला*

# पंचतंत्रातील दोन कहाण्या


रूपांतर

**विनीता अग्रवाल**

अनुवाद

**ललिता रिसबूड**

चित्रे

**पार्थ सेनगुप्ता**



**नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया**

ह्या पुस्तकाला सोपान स्मारक निधीचे अनुदान लाभले आहे.

'दो कहानियाँ पंचतंत्र से' हे पुस्तक नॅशनल बुक ट्रस्ट, इंडियाच्या 'पंचतंत्र की कहानियाँ' ह्या मूळ हिंदी पुस्तकावर आधारित आहे.

ISBN 81-237-3175-2
पहिली आवृत्ती : 2000 *(शके 1922)*
दुसरी आवृत्ती : 2004 *(शके 1926)*
मूळ © विनीता अग्रवाल
मराठी अनुवाद © नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, 2000
Do Kahaniyaan Panchatantra Se *(Marathi)*
रु. 7.00
संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-5 ग्रीन पार्क नवी दिल्ली-110 016 यांनी प्रकाशित केले.



## गंगदत्त शिकला, पण फार उशीरा!


एक भली मोठी खोल विहीर होती. तो जणू काय बेडकांचा एक देश होता. तिथे कितीतरी मंडूककुळे वसली होती. तेथील एका कुळाचा राजा होता गंगदत्त. शेजारील राजांच्या कुरापतींमुळे तो वैतागलेला होता. एके दिवशी गंगदत्त रहाटाला धरून विहिरीतून बाहेर आला.

गंगदत्ताला आपल्या अपमानाचा वचपा काढायचा होता. अचानक त्याला एक काळा साप दिसला. सापाला बघून त्याला एक चाल सुचली. त्याने सापालाच विहिरीत बोलवायचे ठरविले. शत्रूचा नायनाट करायचा होताच. पायात रुतलेला काटा काढायला अजून टोकदार काटा हवा. तसेच एक वैरी ठेचायला अधिक बलवान वैरी हवा. यांतच खरा शहाणपणा आहे. बेत तर बरोबर जमला!

गंगदत्ताने सापाला मैत्रीचा हात पुढे केला. तशी सापाची जीभ शंकेने लवलवली. तो म्हणाला, "गवत आणि आग कधी जवळ येऊ शकतील का?"

गंगदत्त म्हणाला, "बरोबर बोललास. साप आणि बेडूक तसे जुने हाडवैरीच. पण मला तुझी मदत हवी आहे. माझा पाणउतारा झालेला आहे. मी सूडभावनेने जळतो आहे. मला तुझी गरज आहे. माझा जीव तुझ्याच हाती आहे. माझी विनंती ऐक."

सापाने विचारले, "तुझा अपमान कुणी केला?"



बेडूक म्हणाला, "भाऊबंद नेहमी आपलेच असतात. पण कधीकधी तेच शत्रू होतात. आमच्या जातीतच माझी हेटाळणी झालेली आहे."

सुरुवातीला सापाने गंगदत्ताचे बोलणे मनावर घेतले नाही. तो म्हणाला, "तू परत जा कसा. ते मला नाही जमायचे. पचेल तेच खावे आणि जे लाभ देईल, तेच पचवावे. यातच खरा शहाणपणा आहे."

पण गंगदत्त काही ऐकेना. तो अगदी हटूनच बसला. त्याने वारंवार सापाची विनवणी केली.

सापाला आपल्या वयोमानाची जाणीव झाली. दिवसेंदिवस भक्ष्य मिळवणे कठीण होऊ लागले होते. कुळाचा नाश मनात धरून आलेला हा बेडूक आयताच भेटला होता. आता रोज विनासायास खायला मिळाले असते. सापाने हा मागचापुढचा विचार केला. मग तो कबूल झाला. म्हणाला, "तू पुढे हो. मी मागाहून येतो. भल्या कामाला उशीर कशाला?"

गंगदत्त म्हणाला, "तू तिथे सुखात राहू शकशील. पण एक वचन दे. तू केवळ माझे वैरीच निवडशील. माझ्या कुळाला बोट देखील लावणार नाहीस."

सापाने ताबडतोब होकर दिला. म्हणाला, "तू तर माझा मित्रच आहेस. तुला कसली भीती?"

दोघांनी एकमेकांना मिठी मारली. ते विहिरीकडे



निघाले. पुढे गंगदत्त आणि मागे साप. बेडकाने रहाटाला धरून सापालाही विहिरीत नेले. गंगदत्ताने त्याला आपले वैरी नजरेस आणून दिले.

सापाने एक एक करून सारे टिपले. आता बेडकाचे सारे वैरी नाश पावले. यानंतर साप म्हणाला, "आता माझ्या जेवणाची काहीतरी सोय कर. तू मला बोलावून आणलेस. मला खायला काहीतरी मिळालेच पाहिजे. हे तुझेच काम आहे."

गंगदत्ताला इतर बेडकांवर सूड उगवायचा होता. ते काम पार पडले होते. शत्रूकुळातील एकही बेडूक राहिला नव्हता. आता सापाची काय गरज? त्याने म्हटले, "मित्रा, तुला एका खास कामाला बोलविले होते. ते पुरे झाले आहे. तर तू आता जा कसा."

पण सापाने ते मानले नाही. तो अडूनच बसला. म्हणाला, "जरा विचार कर. माझ्या बिळात दुसरा साप रहायला आला असेल. मी आता काही झाले तरी इथून हलणार नाही. तूच माझी भूक भागवली पाहिजे. मला रोज एक बेडूक आणून देत जा. अळंटळं करू नकोस."

आता गंगदत्त पस्तावू लागला. पण करणार काय? त्याला मोठ्यांची शिकवण आठवली. खरेच आहे. जो अधिक बलवान शत्रूशी मैत्री करतो, त्याचे नंतर नुकसानच होते.



पण आता उशीर झाला होता. गंगदत्त निरुपायाने आपल्याच कुटुंबातील एकेक बेडूक देऊ लागला. पण सापाचे पोट काही भरेना. वरकरणी तो एकेकच बेडूक खाई. अन् नजर चुकवून इतरांचाही फडशा पाडी. सापाची लबाडी गंगदत्ताला समजत होती. पण करणार काय? एकदा अंगरखा मळला की माणूस कुठेही बसतो. ती जागा साफ आहे की नाही हे बघतही नाही. तसेच, फार नुकसान झाले की माणूस हतबल होतो. हताश होऊन जातो.

परिस्थिती दिवसेंदिवस खालावत होती. गंगदत्ताला एकच मुलगा होता. सापाने एक दिवस त्यालाही गिळले. गंगदत्त हमसून हुमसून रडू लागला. तो शांत होईना. त्याची बायकोही कातावली. ती म्हणाली, ‘‘हे कुळघातक्या, तू सूडाने पेटला होतास. असा सूड घेतलास की सारे कुळच नाश पावले. आपला मुलगाही बळी पडला. आता रडून भेकून काय उपयोग? आता तुझी पाळी आहे. कळले? आता तरी पळून जाता आले तर बघ.’’

सारे मंडूककुळ नाश पावले होते. केवळ गंगदत्त तेवढा वाचला होता. आता सापाने निलाजरेपणाचा कळस गाठला. म्हणाला, ‘‘मित्रा, मी भुकेला आहे. भुकेने जीव अगदी कळवळतो आहे. मी मरायला टेकलोय.

माझ्या पोटापाण्याची सोय कर.’’

गंगदत्ताने पहिल्यांदाच डोके वापरले. तो म्हणाला, "मित्रा, आता केवळ मीच राहिलो आहे. जरा दम धर. मी बाहेर जातो. आणि इतर बेडकांना बोलावून आणतो." भुकेला हावरट साप या बोलण्याला फसला. म्हणाला, "तू माझा खरा मित्र आहेस. पोटाची सोय कर. कुळाचं नाव काढशील. भुकेने माझा जीव जायची पाळी आली आहे." साप गंगदत्ताला पटवत होता.

पण गंगदत्ताला यातली मेख बरोबर कळली होती. तो जीव मुठीत धरून पळाला. इकडे साप विहिरीत वाट बघत बसला.

दिवसांमागून दिवस लोटले. गंगदत्त आला नाही. आणि इतर बेडूकही. विहिरीच्या कपारीत एक घोरपड होती. सापाने तिला दूत बनविले. म्हणाला, "गंगदत्त माझा मित्र आहे. त्याला बोलावून आण. मला त्याच्याशिवाय करमत नाही. मी शपथेवर सांगतो. मी त्याला खाणार नाही. तो तर माझा मित्र आहे."

घोरपड निघाली. तिने गंगदत्ताचा शोध घेतला. त्याला सापाचा निरोप दिला. म्हणाली, "साप तुझी वाट बघत आहे. विचार करत बसू नको. लवकर परत ये. तो तुझे नखही वाकडे करणार नाही. त्याने शपथ घेतली आहे."

गंगदत्ताने घोरपडीचे सगळे बोलणे ऐकून घेतले. पण त्याला सारे आठवत होते. 'आपली सूडाची भावना–



एकुलत्या एका मुलाचे मरण...' तो म्हणाला, "सापाला सांग, आता गंगदत्त कधीच येणार नाही. सूडाने मी अगदी पेटलो होते. त्यामुळे मी आपल्या कुटुंबाला मुकलो आहे." गंगदत्ताला आपली चूक उमगली होती. तो अगदी ओशाळून गेला होता.

साप आणि बेडकाची ही कहाणी छोटीशीच आहे. पण तिची शिकवण मोठी मोलाची आहे.

सापासारखे हावरट मूर्ख कोणतेही पाप करायला तयार असतात. सूड़ाने पेटलेली बेडकासारखी माणसे आपला नाश आपणच ओढवून घेतात.



## मुंगसाने लाज राखली!

एक आटपाट नगर होते. तिथे एक ब्राह्मण राहत होता. त्याचे नाव देवशर्मा. त्याची बायको गर्भवती होती.

तिचे दिवस भरले. तिला एक मूल झाले. त्याच वेळी एका मुंगसाला पण पिलू झाले. पिलू होताच मुंगूस मरून गेले. मुंगसाचे पिलू अनाथ झाले. ब्राह्मणीला दया आली. तिने ते पिलू घरी आणले. आपल्या बाळाबरोबर ती त्याला दूध पाजू लागली. तेलउटणे लावू लागली. न्हाऊमाखू घालू लागली. जणू ती मुंगसाच्या पिलाचीही आई झाली.

तिच्या मनात माया होती. मायेबरोबर भीती पण होती. धाकधूक अशासाठी की, मुंगसाचे पिलू बाळाला चावणार तर नाही? आपल्या बाळाहून आईला अधिक



प्रिय काही नसते. नालायक, कुरुप, मूर्ख, दुष्ट अशा मुलाला बघूनही आईचे मन भरून येते. म्हणतातच, आपल्या बाळाला आंजारून गोंजारून आईला इतके सुख मिळते की, या सुखापुढे चंदनाची शीतलताही फिकीच!

एके दिवशी ब्राह्मणीच्या घरातले पाणी संपले. तिचे बाळ निजले होते. बाळाला तिने पाळण्यात घातले. पाणी तर आणायला हवेच होते. तिने कळशी उचलली. जाताजाता, जरा थांबून ती पतीला म्हणाली, "मला पाणी भरायचं आहे. मी तळ्यावर निघाले आहे. बाळाकडे लक्ष ठेवा. बघा हं! नाहीतर मुंगूस चावेल." नवऱ्याचे लक्षच नव्हते. इकडे ब्राह्मणी गेली. तिकडे ब्राह्मण भिक्षेसाठी बाहेर पडला. तो जाताच घरात अगदी सामसूम झाली.

घराजवळ एक बीळ होते. बिळात एक भयंकर काळा साप राहत होता. तो आता हळूच बाहेर पडला.

बाळ गाढ झोपले होते. ते कसे सापाला बघणार? आईवडील घरात नाहीत. बाळाची राखण करायची जबाबदारी छोट्या मुंगसावर येऊन पडली.

समोर साप होता. साप तर त्याचा पूर्वापार वैरी. मुंगसासमोर आता भावाच्या जीवनमरणाचा सवाल होता.

मुंगसाला अगदी चेव चढला. ते सारे काही विसरले. त्याने आपले सगळे धाडस आणि बळ एकवटले. ते सापावर चालून गेले. त्याने सापाची खांडोळी केली.



मुंगसाचा जय झाला. सापाच्या रक्ताने त्याचे तोंड लालभडक झाले. जणू विजयाची कहाणी तोंडावर विलसत होती. मुंगूस अगदी आनंदून गेले. ते उतावीळ झाले. धावतच ब्राह्मणीकडे गेले. त्याने भावाचा जीव वाचविला होता. ब्राह्मणीच्या दुधाची लाज राखली होती. मुंगसाला



आपल्या बहादुरीची आणि जयाची कहाणी सांगायची घाई झाली होती.

ब्राह्मणीने मुंगसाचे तोंड बघितले. ते रक्ताने माखले होते. ती भयभीत झाली. वेडीला वाटले, 'ह्याने माझ्या बाळाचा घास घेतला. बाळाचेच रक्त तोंडाला लागले आहे.'

मग काय? तिने मागेपुढे न बघता भरलेली कळशी उचलली. मुंगसावर आदळली. बिचारे मुंगूस जागच्या जागी मरून पडले. रडत भेकत ब्राह्मणी घराकडे धावली. बघते तर काय! बाळ पाळण्यात शांतपणे निजले होते. जवळच मेलेल्या सापाचे तुकडे तुकडे पडले होते.

ब्राह्मणीला आपली चूक कळून आली. तिच्या काळजाने ठाव सोडला. उर बडवून ती रडू लागली. ''असं कसं मी आपलं मुंगूसबाळ मारलं? त्यानं माझं बाळ वाचविलं आणि मी मात्र त्याच्या जीवावर उठले. हाय मुंगसा! हाय रे बाळा!''

सारासार विचार न करता वागणारे या ब्राह्मणीसारखे पस्तावतात. ते आपला नाश आपणच ओढवून घेतात.

मुद्रक : जे. के. ऑफसेट प्रिंटर्स, नांगलोई, दिल्ली – 110041